# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४९१**

**अपिलार्थी ॲड. लक्ष्मण नारायण बेडेकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (एसडी-२)**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव (एसडी-२)**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३०.१०.२०२३ | - | ३०.१२.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०५.०४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

अपिलार्थी यांनी दि. ३०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"कुमार बाळकृष्ण नारायण बेडेकर व कुमारी संगिता नारायण बेडेकर यांनी दि. १५.०५.२०१४ रोजीच्या अर्जासह नमूद संदर्भान्वये व मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र दि. २४.११.२००६ रोजीच्या पत्रानुसार शाळेच्या दाखलवहीत नोंदविलेली चुकीची जात व जन्मठिकाण दुरूस्त करून तसा दाखला मिळणेबाबत विषयाच्या अर्जावर कार्यवाही केलीबाबतची, सदर प्रकरणातील मा. न्यायालयीन आदेश, शासन निर्णय दि. १६.०३.१९८३ व परिपत्रक, सक्षम अधिकारांचा अहवाल व आदेश त्याबाबतचे सर्व पत्रव्यवहार तसेच आपणांकडील नियम आणि शासनाचे नियम याची माहिती व त्या नियमानुसार कामकाज होत असल्यास, नसल्यास या कार्यवाहीचे नियम/पध्दती आणि आपलेकडील पत्रव्यवहार या सर्व बाबतची सविस्तर माहिती मिळणेकामी विनंती करीत आहे. उक्त प्रमाणे तसेच उपरोधातात उल्लेख असलेल्या या संचिकेच्या सर्व कागदपत्रांच्या छायांकीत व स्वाक्षांकीत प्रती मिळाव्यात. सदरची माहिती. अति तात्काळ मिळावी जेणेकरून शैक्षणिक नुकसानी टळू शकेल, ही नम्र विनंती करीत आहे."*

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहेत. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दलच्या खुलाशासह तसेच सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीच्या माहितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

9-9-2025

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ०९.०९.२०२५** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai